IO. पुरा (39)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): जालना **P.S.**(ठाणे): गोंडी

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0040 **Year** (वर्ष): 2024

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):04/02/2024 14:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 04/12/2023
**Date To** ( दिनांक पर्यंत): 29/12/2023
**Time From** (वेळेपासून): 22:15 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 02:20 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 04/02/2024 **Time** (वेळ): 14:22 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 006

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 04/02/2024 14:22 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पश्चिम, 10 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): वडिगोद्री शिवारातील हरिओम , हॉटेल समोरील उड्डाण पुलाखाली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

(40)



6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोष सखाराम कांबळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गोंदी ता अंबड,गोंडी,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गोंदी ता अंबड,गोंडी,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रविन लक्ष्मण पवार | | | 1. महसुल सहायक,तहसिल कार्यालय अंबड,गोंडी,जालना, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री खंडागळे पुर्ण नाव माहीत नाही. | | | 1. पुर्ण नाव गाव माहीत नाही,गोंडी, जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.04/02/2024

मी संतोष सखाराम कांबळे, वय-35 वर्षे व्यवसाय- शेती रा. गोंदी ता. अंबड जि. जालना मो.नं. 9552358538
दिनांक 28/12/2023 रोजी मी व माझा सहकारी आसमान उर्फ पप्पु गात सह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे हजर येऊन पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे, यांचेकडे दोन पंचासमक्ष तक्रार दिली होती की, " मी वरील ठिकाणी राहात असुन शेती व्यवसायासह वाळु वाहतुकीचा व्यवसाय करतो. माझे कडे अशोक लेलँड कंपनीची दोन ब्रास क्षमतेची सहाचाकी टिप्पर क्र. MH 21 BH 5938 असुन ते माझे नावावर आहे. सदर गाडी मी व आमच्या गावातील आसमान उर्फ पप्पु गात असे मिळुन वाळु व्यवसायावर चालवत आहे.
दिनांक 21/12/2023 रोजी माझी वरील क्रमांकाची रिकामी गाडी सोनक पिंपळगाव ता. अंबड जि. जालना येथुन जात असतांना, सदर गाडी अंबड तहसील कार्यालयाचे महसुल विभागाचे नायब तहसीलदार श्रीमती भालचंद्र मॅडम व श्री. प्रविण पवार यांनी पकडल्याबाबत मला माझे गाडीवरील चालकाने कळविल्याने मी सोनक पिंपळगाव येथे गेलो असता, श्री. प्रविण पवार मला म्हणाले की, मी अंबड तहसील कार्यालयातील अवैध वाळु वाहतुक विरोधी पथकात असुन तु या गाडीने चोरुन अवैध वाळु वाहतुक करतो. अशी आम्हाला माहिती मिळाली आहे. मी तुझी गाडी सोडणार नाही या गाडीवर कारवाई करणार आहे. तेव्हा मी त्यांना गाडीवर कारवाई न करता सोडुन देण्याबाबत विनंती केली असता, महसुल पथकातील श्री पवार मला म्हणाले की, तुझी गाडी कारवाई न करता सोडायची असेल तसेच यापुढे या गाडीने अंबड हददीतुन अवैध वाळु वाहतुक करावयाची असेल तर मला 50,000/- रुपये द्यावे लागतील असे म्हणाले. मी जर श्री.पवार यांना 50,000/- रुपये दिले नाहीतर ते माझ्या रिकाम्या जाणाऱ्या गाडीवर खोटी केस करुन माझी गाडी जप्त करतील. म्हणुन मी भितीपोटी नाईलाजास्तव श्री. पवार यांना त्यांनी मागणी केलेले 50,000 /- रुपये नंतर आणुन देतो असे म्हणालो होतो. मी पैसे देण्यास होकार दिल्याने श्री. पवार व नायब तहसिलदार श्रीमती भालचंद्र मॅडम यांनी माझी गाडी सोडुन दिली होती.
त्यानंतर दिनांक 27/12/2023 रोजी मला व माझा साथीदार आसमान उर्फ पप्पु गात याला महसुल विभागाचे श्री.पवार भेटले व म्हणाले की, नायब तहसीलदार भालचंद्र मॅडमला मी शब्द दिला आहे. त्या दिवशी मी तुझी गाडी माझ्या हिमतीवर सोडली आहे. तेव्हा तु उद्या रात्री दहा वाजे पर्यंत 50,000/- रुपये घेवुन वडीगोद्री येथे ये माझी फिरत्या पथकावर ड्युटी आहे असे म्हणाले. मला महसुल विभागाचे श्री.पवार यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझा महसुल विभागाचे श्री. प्रविण पवार यांच्याशी कोणताही देण्याघेण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच माझा त्याच्याशी कोणताही भांडणतंटा अगर वैर दुष्मनी नाही.
मला आज दिनांक 28/12/2023 रोजी रात्रीचे 10 वाजेपर्यंत वडीगोद्री या ठिकाणी महसुल विभागाचे श्री. प्रविण पवार यांनी मागणी केलेले 50000/- रुपये घेवुन बोलावले आहे. मी व माझ्या गावातील वाळु वाहतुकीतील माझ्या सोबतचा सहकारी आसमान उर्फ पप्पु गात असे आम्ही आज रात्री 10 वाजेपर्यंत श्री. प्रविण पवार यांची वडीगोद्री येथे भेट घेवुन माझा वाळुचा व्यवसाय सुरळीत चालु देण्यासाठी व माझी गाडी सोडण्याचा मोबदला म्हणुन मागणी केलेले 50000/- रुपये जास्त होतात म्हणुन पैसे कमी करण्यासाठी विनंती करणार आहे. त्यावेळी श्री. प्रविण पवार हे माझ्याकडे लाचेची मागणी करुन स्वत: अगर इतरांमार्फत लाच रक्कम स्वीकारतील. त्यावेळी त्यांना लाचेच्या रकमेसह पकडुन त्यांच्यावर योग्य ती कायदेशिर कारवाई करावी हि विनंती." वगैरे मजकुराची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथील पो.नि. वारे यांचेकडे दिली होती. माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे यांनी पंच व आमच्या सर्वानुमते पैशाची मागणी होते किंवा कसे याची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय दिनांक 28/12/2023 रोजी घेऊन लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाई बाबत माहिती

दिली.
त्यानंतर मी व आसमान उर्फ पप्पु गात आमचेकडील चारचाकी खाजगी गाडीने पुढे गेलो त्यानंतर पोलीस निरीक्षक वारे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे दुनगांव फाटा परिसरात हजर आले. आम्ही तेथे गेलो. त्या ठिकाणी मला माझा सहकारी आसमान उर्फ पप्पु गात दोन्ही पंच व सापळा पथक यांना लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईच्या अनुषंगाने पुन्हा माहीती व सुचना दिल्या.

त्यानंतर अंबड तहसील कार्यालयातील महसुल विभागाचे प्रविण पवार साहेब यांचेशी आम्ही संपर्क केला असता त्यांनी हरीओम हॉटेल समोरील उडडाण पुलाखाली, वडीगोद्री परिसरात भेट घेण्यासाठी बोलविले. त्यावेळी दिनांक 28/12/2022 रोजी रात्री अंदाजे सव्वा दहा वाजेच्या सुमारास माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन पंच क्र.1 व माझा सहकारी पप्पु गात यांना सोबत घेऊन माझ्या कडील खाजगी चारचाकी वाहनाने, अंबड तहसील कार्यालयातील महसुल विभागाचे प्रविण पवार साहेब यांच्या भेटी करीता हरीओम हॉटेल समोरील उडडाण पुलाखाली, वडीगोद्री परिसरात पाठविले. हरीओम हॉटेल समोरील उडडाण पुलाखाली, प्रविण पवार साहेब आले. त्या ठिकाणी प्रवीण पवार यांची पंचासमक्ष समक्ष भेट घेतली. त्यावेळी मी पंच क्र. 1 यांचे समक्ष अंबड तहसील कार्यालयातील महसुल विभागाचे अवैध वाळु वाहतुक विरोधी पथकातील प्रविण पवार साहेब यांना बोललो की, गाडी सोडून दिल्याचा मोबदला व यापुढे गाडी सुरळीत चालू देण्यासाठी 50 हजार रुपये लय जास्त होतात कांही कमी करांना असे बोललो असता यांनी मला बोलले की, काही झाटा होणार नई उगं रिकाम ताण देऊ नको अन् तु सुखानं झोप नसंण होत तर तुला ट्रिपा मारायला मी कोतवाल देतो, असे बोलून अरे त्या पन्नास ला पाच लाख कमीव ना रे असे म्हणुन माझ्याकडे माझ्या गाडीचा वाळुचा व्यवसाय सुरळीत चालु देण्यासाठी व माझी वरील गाडी पुर्वी पकडलेली सोडली होती त्या गाडी सोडण्याचा मोबदला म्हणुन नायब तहसिलदार भालचंद्र मॅडमच्या नावाने आरं सकाळी द्यावे लागंल रे तिला जायचं त्याच्यामुळं मला काय म्हणी माहीती हे का तुमच्याकडं असतील तर पन्नास एक हजार असंल तर द्या म्हणलं मॅडम ठिक-ठीक करतो करतो  तु रात्री कर पण ॲडजस्ट कर पण मी सकाळी पैशे नई घेणार तुह्याकडुन दोघं तुम्ही रात्री दोन तीन ला  किती वाजता द्या आज द्या क्लिअर मिटवा हा विषय असे म्हणुन 50,000/- रुपये पैशाची मागणी करुन मागणी केलेली रक्कम त्याच रात्री दोन-तीन वाजता 50,000/-रुपये स्वत: स्विकारणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर मी आसमान उर्फ पप्पु गात व पंच क्र.1 असे आम्ही सुरिक्षीत ठिकाणी परत आलो. त्यानंतर माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेऊन पोलीस निरीक्षक हनुमंत वारे व पंच यांनी त्यातील संभाषण ऐकले. त्यानंतर वारे साहेबांनी सापळा कारवाई बाबत माहीती देऊन सुचना दिल्या.

त्यानंतर प्रवीण पवार यांनी माझ्याकडे मागणी केलेली रक्कम 50,000/- रुपये ज्यामध्ये पाचशे रुपये दराच्या शंभर चलनी नोटा मी पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे यांचेकडे हजर केले व त्यांना सांगितले की, प्रवीण पवार यांनी मला सदर लाचेची रक्कम घेऊन पाचोड टोलनाक्याच्या पुढे बोलविले आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे यांनी त्या नोटांचे नंबर घेऊन त्या नोटांना त्यांच्या पथकातील पोलीसाकडुन पंचासमक्ष पावडर (ॲन्थ्रॉसीन पावडर) लावुन माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पंच क्र.1 यांच्यासह माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला. त्यावेळी दिनांक 29/12/2023 रोजी पहाटेचे 01.50 वाजले होते त्यानंतर मी व पंच क्र.1 व माझा सहकारी श्री. पप्पु गात असे माझ्या खाजगी चारचाकी वाहनाने प्रवीण पवार साहेब यांचे भेटीकरता पाचोड टोलनाक्या जवळील रोडवर असलेल्या शुभंम हॉटेल जवळील शेकोटी जवळ जाऊन बसलो असता त्या ठिकाणी प्रविण पवार, हे त्यांचे 2 सहकाऱ्यांसह पांढऱ्या रंगाचे चारचाकी गाडीतून आमचेजवळ आले. त्यावेळी माझी व माझा सहकारी श्री. पप्पु गात व प्रविण पवार व त्यांचे सहकारी यांचेत बोलणे झाले त्यावेळी मी प्रविण पवार साहेबांना, तुम्ही काय ऐकनाव बवा..मी काय बेजार बेजार हाय..असे बोललो त्यावेळी प्रविण पवार साहेबांसोबतचा त्यांचा सहकारी खंडागळे बोलला की, पवार साहेबांच लय मोठं मन हाय भैय्या त्यावेळी मी पन्नास हजार रुपयांतुन कांही कमी करण्याची विनंती केली तेव्हा प्रविण पवार साहेबांनी कई नको..तोंडातुन कईच बोलू नको.. उगंच माझ्या शिव्या खाशील आण रिकामं आजुन आडवं..असे बोलले व त्यानंतर माझी यापुर्वी गाडी पकडलेल्या विषयी बोलणं झालं. त्यावेळी खंडागळे हे बोलले की, हे बघा जमवुन घ्यायचं असलतं सगळं जमतं.. पण आपल्याकुन हूकुन नाही दयायचं..जमवुन घ्यायचं..पवार साहेब हाय जिंदाबाद विषय खल्लास असं हाय असे बोलले त्यानंतर मी प्रविण पवार साहेबांना बोललो मला वाटतं आपेक्षा हाय तुमची..त्यावेळी प्रविण पवार साहेब बोलले आपेक्षा हायनां. त्यानंतर मी पन्नास हजारातुन कांही कमी करण्याची विनंती केली असता प्रविण पवार साहेब बोलले की, तुम्ही काय करायला पाहिजे होतं माहीत हाय का..अरे वाघाच्या जबड्यातून गाडी आम्हाला तोंडावर दिली म्हणावं तुम्ही..त्या खुशीनं तुम्ही हे करायला पाहिजे..गेटला गेली नाही गाडी. त्यावेळी मी परत त्यात पैसे कमी करण्याची विनंती केली असता खंडागळे यांनी करा होईन तेवढं कमी असे बोलले, त्यावेळी प्रविण पवार यांनी मला हया वेळस माफ करा, तुम्हाला

बारा महिने सुट दिली हाय.. मी एवढा ताणनारा माणुस काय का रे असे बोलत असताना प्रविण पवार साहेब व त्यांचा साथीदार खंडागळे यांना त्यांचा तिसरा साथीदार यांचा फोन येतो व प्रविण पवार व खंडागळे एकापाठोपाठ त्यांचे गाडीकडे जाऊन त्या गाडीत बसुन तिघेही माझ्यावर संशय घेऊन लाचची मागणी केलेली रक्कम 50,000/- रुपये न घेता निघुन गेले.
त्यानंतर पंच क्र. 1 व मी तसेच श्री. पप्पु गात बराच वेळ श्री. प्रविण पवार हे मला लाचेची रक्कम घेऊन बोलवतील. म्हणुन आम्ही वाट बघीतली. परंतू मला श्री. प्रविण पवार यांनी लाचेची रक्कम घेऊन येण्याबाबत बोलविले नाही. त्यानंतर आम्ही सुरक्षित ठिकाणी परत आलो.
दिनांक 09/01/2024 मला पो.नि. श्री.वारे यांनी फोनकरुन लाचमागणी करणारे श्री. प्रविण पवार यांची भेट घेऊन लाच देण्यासाठी ते कुठे आहे. याबाबत माहीती काढण्यास सांगितले असता मी पो.नि. वारे यांना कळविले की, अवैध वाळु विरोधी पथकाचे श्री.प्रविण पवार हे त्यांचे पथकासह वडीगोद्री परीसरात येणार आहे. ते कोणत्याही क्षणी मला पैशाची मागणी करुन पैसे घेवुन जातील तेव्हा तुम्ही तात्काळ श्री. प्रवीण पवार व श्री. खंडागळे यांचेवर सापळा कारवाई करण्यासाठी तुमचे पथकासह वडीगोद्री परिसरात या असे कळविल्याने पो.नि. वारे हे त्यांचेपथकासह व पंचासह वडीगोद्री परीसरात आले. त्यावेळी मी वारे साहेबांची भेट घेऊन दिनांक 28/12/2023 रोजी दिलेल्या तक्रारीत मी माझी दिनांक 21/12/2023 रोजी गाडी पकरणाऱ्या नायब तहसीलदार भालचंद्र मॅडम यांचे नाव सांगितले होते. परंतू भालचंद्र मॅडम यांचे नाव भालचंद्र नसुन भालचीम मॅडम असे असल्याचे खात्रीलायक सांगितले.
. तदनंतर आम्ही रात्रभर प्रतिक्षा करण्यात केली. त्यानंतर पहाटेच्या सुमारास आलोसे श्री. प्रवीण पवार हे SDM साहेबांच्या गाडीत गस्तीत असुन SDM साहेबांना सोडल्यानंतर श्री. प्रविण पवार यांना फोन करण्याचे ठरले. त्यानुसार माझा सहकारी श्री पप्पु गात यांनी श्री. प्रविण पवार यांना दिनांक 10/01/2024 रोजीच्या सकाळी आठ वाजेच्या सुमारास फोन केला असता श्री. प्रवीण पवार यांनी कळविले की, माझी ड्युटी संपलेली आहे. मला वेळ नाही. मी तुम्हाला भेटणार नाही. असे फोनवर सांगुन न भेटताच परस्पर निघुन गेले. ........
टिप - ( सी.सी.टी.एन.एस. प्रमाणे मध्ये 8000 अक्षरा पेक्षा जास्त बसत नसल्याने पुढील फिर्याद स्वतंत्र पान क्र.2 वर घेण्यात आली आहे.करीता नोंद. )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Sandip Pandharinath Kute
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): 1299
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

त्यानंतर मी माझे घरगूती कामानिमीत्त बाहेरगामी गेलो होतो. बाहेर गावाहुन आल्यानंतर ते आज पर्यंत मी श्री. प्रवीण पवार यांना वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद न देता जाणुन-बुजुन माझी भेट घेण्यास टाळाटाळ करीत असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम 50,000/- रुपये माझ्याकडुन घेणार नाही.याची आता माझी पक्की खात्री झालेली आहे.

तरी श्री. प्रवीण लक्ष्मण पवार, महसुल सहाय्यक, तहसील कार्यालय अंबड रा. तहसीलचे पाठीमागे चांगलेनगर, अंबड जि.जालना यांनी दिनांक 28/12/2023 रोजी 50,000/- रुपये वरील प्रमाणे केलेली लाचमागणी व दिनांक 29/12/2023 रोजी श्री.प्रवीण पवार यांचा सहकारी श्री. खंडागळे यांनी श्री. प्रविण पवार यांना मी पैसे दयावेत यासाठी मला लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिलेले आहे.प्रवीण पवार व खंडागळे यांना माझ्यावर व माझा साथीदार श्री.आसमान उर्फ पप्पु गात याचेवर संशय आल्याने ते माझ्याकडुन त्यांनी मागणी केलेले 50,000/- रुपये स्विकारणार नाही याची मला पुर्ण खात्री झाली असल्याने श्री. प्रवीण लक्ष्मण पवार, महसुल सहाय्यक, तहसील कार्यालय अंबड रा. तहसीलचे पाठीमागे चांगलेनगर, अंबड जि.जालना व श्री. खंडागळे पुर्ण नाव पत्ता माहीत नाही. यांचेवर लाचमागणीबाबत कायदेशीर कारवाई करण्यात यावी हि विनंती आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

पोलीस ठाणे, गोंदी ता. अंबड जि. जालना